श्री. आनंदा दादाभाऊ औटी, तत्का कनिष्ठ सहाय्यक, एबाविसे प्रकल्प पारनेर, यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत...

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/ आस्था-३/१७५६९७६/८०३/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील ज्ञापन /दोषारोपपत्र क्र.साप्रवि-१/आस्था-३/३५८/२०२५ दिनांक ०८/०५/२०२५

२. इकडील निलंबन आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/३५९/२०२५ दिनांक ०९/०५/२०२५

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था-१/ ८७/२०२५ दिनांक १५/०९/२०२५ समवेत श्री औटी यांचा खुलासा दिनांक ०२/०६/२०२५

४. इकडील चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी नेमणुक आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/ १७५६९७६/१०६४/२०२५ दिनांक ०२/१०/२०२५

५. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा-४/खाचौ/ सी.आर.११३/२०२५ दि १६/०६/२०२६ प्राप्त दि १३/०७/२०२६

६. इकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/१७५३९७६/६९४/२०२६ दिनांक २३/०७/२०२६

७. श्री.आनंदा दादाभाऊ औटी, कनि सहा, यांचा खुलासा दिनांक ०६/०८/२०२६

८. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२)

ज्याअर्थी श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक, हे एकात्मिक बाल विकास प्रकल्प पारनेर येथे कार्यरत असताना अनाधिकृत गैरहजर रहाणे, कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा करणे इत्यादी गैरवर्तन केल्याने संदर्भ क्र. १ अन्वये ज्ञापन दोषारोप बजाविण्यात आले. सदर ज्ञापन दोषारोप पत्रामध्ये श्री. औटी यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप संदर्भ क्र. ३ अन्वये श्री. औटी यांनी दिनांक ०२/०६/२०२५ रोजीचे खुलाशानुसार अमान्य केले. श्री. औटी यांनी सदरचे दोषारोपातील आरोप अमान्य केलेने न्याय हक्काचे दृष्टीने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम (६) मधील तरतुदीनुसार संदर्भ क्र.४ नुसार, श्री. औटी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी तसेच सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक करणेत आली.

संदर्भ क्र.५ चे सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील चौकशी पुर्ण होऊन चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर चौकशी अहवालानुसार श्री. औटी यांचेवर ठेवणेत आलेले सर्व तीनही आरोप सिध्द होत असलेचे निष्कर्ष प्राप्त झालेले आहे. त्यानुसार या कार्यालयाकडील संदर्भ क्रं.६ नुसार श्री. औटी यांना विभागीय चौकशी अहवालाच्या अनुषंगाने अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदरची अंतिम कारणे दाखवा नोटीशीस संदर्भ क्रमांक ७ श्री औटी यांनी खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलाशात श्री. औटी यांनी त्यांचा खुलासा मान्य करणेत येऊन अंतिम करणे दाखवा नोटीस मध्ये नमुद केलेली शिक्षा करणेत येऊ नये अशी विनंती केली आहे.

..२

त्याअर्थी श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक, यांचेवर ठेवणेत आलेले आरोप, विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष, तसेच श्री. औटी यांनी सादर केलेला खुलासा पहाता सदर प्रकरणी श्री. औटी यांनी कार्यालयीन कामी हलगर्जीपणा व गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने एक वर्षाकरीता थोपविणे ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक, जि.प.लपा उपविभाग श्रीगोंदा, यांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 20261114040212 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 14-11-2026 12:58:34
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक, जि.प.लपा उपविभाग श्रीगोंदा.
द्वारा :- उप अभियंता, जि.प.लपा उपविभाग श्रीगोंदा.

प्रत:- उप अभियंता, जि.प.लपा उपविभाग श्रीगोंदा.

२/- सदरचा आदेश श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक, जि.प.लपा उपविभाग श्रीगोंदा यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत:- निवड नस्ती

स्वाक्षरी /--
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर